# रात्र पावसाची

- डॉ. सुनिता ओक.

१६ जुलैची रात्र होती. रात्रीचा एक वाजला होता. मुसळधार पाऊस कोसळत होता. ढग गडगडत होते, विजा कडाडत होत्या. कलेक्टर ऑफिसच्या नजीकच्या पोलीस ठाण्यात कधी नसेल एवढी शांतता पसरली होती. विज गेली होती, त्यामुळे मेणबत्त्यांच्या मिणमिणत्या उजेडात काम चाललं होत. कधी नव्हे ते फोन आणि वायरलेस पण शांत होते. जसं काही निसर्गाचं रौद्र रूप बघून सगळ्यांची वाचा गेली होती. अशातच एका टेबलासमोरच्या, हात तुटक्या खुर्चीत डॉ. रेवती आपटे बसली होती. तिचा सावळा चेहरा घामाने डबडबला होता, तर डोळ्यात केविलवाणे भाव तरळत होते. एका हातात पर्स तर दुसऱ्या हातात मोबाईल फोन घट्ट धरला होता. समोर बसले होते इन्स्पेक्टर समीर कांबळे. खोलीतली हवा जशी काही अव्यक्त विचारांच्या कोलाहलानी तुडुंब भरलेली, कधीही स्फोट होऊन आपणच भडाभडा बोलू लागेल असे वाटणारी. भिंतीवरच्या घडयाळाची प्रत्येक टिक-टिक जणू बंदूकीतून निघालेली गोळीच !

रेवतीने पुन्हा एकदा घड्याळावर नजर टाकली आणि इन्स्पेक्टरना विनवले, "सर प्लीज, रात्री अकरापासून मी तुमच्या समोर बसून आहे. प्लीज , मला मदत करा ना. माझा मुलगा राहुल जो सकाळ पासून घराबाहेर पडलाय, तो अजून घरी आला नाहीये. काहीतरी चौकशी करा, माहिती काढा ना." इन्स्पेक्टर समीरने दीर्घ श्वास सोडला आणि दोन्ही हात जणू काही आधारासाठी टेबलावर ठेवले. "डॉ. रेवती, मला परत एकदा सांगा काय घडलं ते. "

"मी नेहमी प्रमाणे सकाळी आठ वाजता घर सोडलं, हॉस्पिटलला जाण्यासाठी."

"तेव्हा राहुल काय करीत होता ?"

"जस्ट उठला होता. ब्रेकफास्ट करत होता."

"त्याचा मुड कसा होता ? काही बोलला का तो ? कुठल्या मित्राकडे जाणार वगैरे ?"

रेवती मात्र टक लावून खिडकीच्या बाहेर चाललेल्या पावसाचा धुमाकुळ बघत होती.

"डॉ. रेवती "कांबळेंनी तिचं लक्ष आपल्याकडे वेधायचा प्रयत्न केला.

रेवती दचकली. खुर्चीत सावरून बसली. नकळत डोळे पाणावले.

"तसा दोन-तीन दिवसांपासून अस्वस्थ आहे. तो ह्या आरक्षण आणि आरक्षण विरोधीच्या वादात खूप कनफ्यूझ झालाय. माझं नाव रेवती म्हात्रे. माझ पूर्ण शिक्षण मी Category च्या सीटवर केलं, अगदी M.S. सुध्दा. मग मात्र लग्न मी रवींद्रशी केलं - रवींद्र आपटे. आता हा आमचा मुलगा - राहुल आपटे. जात बापाची लावायची. त्यामुळे तो ब्राह्मण. राहुलला आरक्षणाचा फायदा नाही. लहानपणापासून त्याच्या बाबांनी मनावर हेच बिंबवलय. आपण नेहेमी "ओपन मेरीट" मध्ये कॉमपीट करायचं."

हे बोलत असतानाच, डोक्यावरचं पाणी झटकत रवींद्र आत येतो. दोन हवालदार त्याला थांबवायला बघतात, पण तो त्यांना ढकलून आत येतो.

"रेवती, काही खबर ? सापडला का आपला राहुल ?"

"हा माझा नवरा रवींद्र आपटे" रेवती इन्स्पेक्टरशी त्याची ओळख करून देते "आणि हे इन्स्पेक्टर समीर कांबळे हे आपल्याला मदत करताहेत." तेवढ्यात जोरात गडगडाटाचा आवाज येतो. आणि काही शब्द रवींद्रला ऐकू येत नाहीत. "कोण, कांबळे ?" रवींद्रने विचारले.

"का तुला काही प्रॉब्लेम आहे का ?" रेवती रागावली.

"अग मला कसला प्रॉब्लेम, नीट ऐकू आलं नाही म्हणून विचारलं " रवींद्रने स्पष्टीकरण दिलं.

"हो, कांबळे म्हटल्यावर तुला प्रॉब्लेम वाटला असेल ना" रेवती ने खवचटपणे विचारलं. "तसं असतं तर तुझ्याशी लग्न केल असतं का मी ?" रवींद्रही चिडला.

"अरे पोलीस स्टेशनवर येऊन भांडताय काय दोघे ? तुमची भांडणं बघूनच नाही ना पळून गेला तुमचा छोकरा ?" कांबळे ओरडले. "सगळी हिस्ट्री सांगा तुमची."

दोघेही स्तब्ध झाले. वीस वर्षापूर्वीचे दिवस आठवले. रेवतीची सर्जरी रेसिडेन्सी चालू होती. रवींद्र फिलॉसॉफीचा lecturer होता. एका कॉमन मित्राकडे अशाच एका पावसाळी रात्री त्यांची भेट झाली होती. पाहता क्षणीच रेवती त्याला आवडली. तिची हुशारी, तिचा आत्मविश्वास, तिचे तेजस्वी डोळे, सगळं मनाला भावलं. रवींद्र आपल्या आडनावाला साजेसा गोरा, घारा, राजबिंडा होता. मित्राने दोघांची ओळख करून दिली.

"आपटे ... म्हणजे बाह्मण ना ?" रेवतीने विचारले.

"हो एनी प्रॉब्लेम ?" रवींद्रने उलटा प्रश्न केला.

"आपण आलोय बोडसांच्या घरी, सगळीकडे नुसते ब्राह्मण दिसत आहेत." रेवती पुटपुटली.

"मी कधीही कोणाची जात बघत नाही, माणूस बघतो" रवींद्रने जरा मूड हलका करायचा प्रयत्न केला.

"मला काही प्रॉब्लेम नाही. प्रॉब्लेम तुम्हाला असू शकतो."

"मी रेवती म्हात्रे," रेवती ठसक्यात म्हणाली.

"असं का ! ग्लॅड टू मि्ट यू" रवींद्र मिस्किलपणे हसला.

"कळलं नाही वाटतं तुम्हाला, मी म्हात्रे, रिझर्व कॅटेगरी"

"कसली कॅटेगरी घेऊन बसलात. किती वर्षे झाली स्वातंत्र्य मिळून. आता ह्या सगळ्या पलिकडे जाऊन विचार करायला हवा आपण." रवींद्र म्हणाला, "काय करता तुम्ही"

अशी झाली त्यांची पहिली भेट. दोघेही हुशार, देखणे, आवडी-निवडीपण सारख्या, त्यामुळे प्रेमात पडायला वेळ लागला नाही. रवींद्र अजिबात महत्त्वाकांक्षी नव्हता. आपलं कॉलेज, लेक्चर, निवडक मित्र आणि आता रेवती, ह्यात तो संतुष्ट होता. रेवती मात्र महत्त्वाकांक्षेनी पेटलेली. सगळ्यात जिंकायच्या भावनेनी झपाटलेली. प्रत्येक परिक्षेत तीच पहिली आली पाहिजे हा स्वतःशी अट्टाहास; नाही आली तर स्वतःवर खूप चिडायची. चारचौघांमधेपण रेवतीच चमकणार, एवढं काय, तिच्या गाडीला कोणी ओव्हरटेक केलं तर केवढी चिडायची ! रवींद्र हसण्यावारी न्यायचा "अग सारखं कसं पहिलं येता येईल ? जरा हरायची पण सवय ठेव. कठीण जाईल पुढे तुला."

"तुम्हा ब्राह्मणांना असं म्हणणं सोप आहे. शतकांशतके तुम्हाला राजासारखी वर्तणूक मिळाली आहे," रेवती म्हणायची "आम्हाला कायम झगडावं लागतं."

"अग ब्राह्मण होतेच ना ज्ञानी, सुशिक्षित. वेद, उपनिषद इ. चा अभ्यास होता त्यांचा." रवींद्र सहज बोलायचा.

"म्हणून काय त्यांनी खालच्या जातीवर जे अत्याचार केले, जे शोषण केलं, ते योग्य होत का ? त्यांच्या पापांची शिक्षा त्यांना मिळालीच पाहिजे." रेवतीचा आवेश वाढतच जायचा.

"हो, हो, तुझं बरोबर." मामला अजून चिघळायच्या आधी रवींद्र माघार घ्यायचा. हा विषय वगळला, तर दोघे जसे काही मेड फॉर इच अदर.

अशीच एक पावसाळी रात्र होती. अकराचा सुमारास रवींद्र रेवतीच्या हॉस्पिटलमध्ये पोहोचला. थेट तिच्या युनिटच्या वॉर्डात गेला. आत्तापर्यंत वॉर्डातल्या नर्स त्याला ओळखू लागल्या होत्या. एक जण पटकन पुढे आली. रवींद्रने खुणेनेच विचारले, "कुठे आहे ?" म्हणाली, "आत्ताच सर्जरी संपवून, बाहेर नोट्स लिहितायत. ओ.टी. च्या बाहेर भेटतील." आणि मग हसून "खूप दमल्या असतील सो प्रोसिड ॲट युवर ओन रिस्क." रवींद्र जोरात हसला. त्याच्या हसण्यानी जवळचा पेशंट जागा झाला ."सॉरी दादा, Wish me luck" असं म्हणून रवींद्र तिथून सटकला. पेशंटनी पण हात केला व दुसऱ्या कुशीवर वळला.

चाहूल लागल्यावर रेवतीने वर बघितलं. "रवींद्र मी खूप दमले आहे. अजून रात्रीचा राऊण्ड पण बाकी आहे, मी कुठेही येणार नाही."

"नो प्रॉब्लेम स्वीट हार्ट" म्हणत रवींद्र चक्क तिच्या समोर गुडघ्यावर बसला.ऑपरेशन थिएटरमधून वापरलेले इन्स्ट्रूमेन्ट्स एका ट्रे मध्ये घेऊन येणारी नर्स दारातच थबकली. रेवती घाबरून उभी राहिली. "रवींद्र, what ......

एखाद्या जादुगारासारखी रवींद्रनी खिशातून अंगठी काढली आणि उजवा हात हृदयावर ठेवून तिला म्हणाला, "डॉ. रेवती म्हात्रे, माझ्याशी लग्न करशील का ? हो म्हण नाहीतर तुझ्या ऑपरेशन थिएटरच्या बाहेर मी अखेरचा श्वास घेईन आणि उगाच तुझ्यावर इन्क्वायरी होईल." रेवती जागीच जणू थिजून गेली. हृदयाची धडधड एवढी वाढली की सवयीने तिची नजर मॉनिटर कडे गेली की अलार्म आता वाजेल. मग तिच्या लक्षात आलं की ही धडधड स्वतःच्या हृदयाची आहे. तो एक क्षण जणू सारं जग थांबून फक्त तिच्या उत्तराची वाट बघत होत. हळूच तिच्या तोंडून निघालं - 'Yes' आणि तेवढ्यात धडाम करून जोरात आवाज झाला आणि तो जादूई क्षण निसटला. नर्सच्या हातून तो इन्ट्रूमेन्ट ट्रे खाली पडला. होणाऱ्या गोंधळात रवींद्रने पटकन रेवतीला अंगठी घातली. सगळ्यांनी टाळ्या वाजवल्या व आपापल्या कामाला गेले. "तुझ्या घरचे काय म्हणतील," रेवतीने विचारले.

"यू नो आय डोन्ट केर ," रवींद्रने निक्षून सांगितले.

पण रेवती काही बोलणार, तेवढ्यात रवींद्रने तिला अलगद मिठीत घेतलं आणि विषय तिथेच संपला.

पुढे दोघांचे लग्न झाले - कोर्ट मॅरेज केले, कारण रवींद्रच्या घरी ही मुलगी पसंत नव्हती. पण रवींद्रनी त्यांच्या आनंदाला जराही विरजण लागू दिले नाही. खूप प्रेम करायचा तो रेवतीवर. रेवती M.S. झाली. गोल्ड मेडल मिळवलं. एका मोठ्या कॉर्पोरेट हॉस्पिटलमध्ये लागली. राजा-राणीचा संसार आनंदाने सुरू होता. भांडण व्हायचं ते फक्त 'आरक्षण' या विषयावरून. रेवतीच्या मनात न्यूनगंड आला होता, की आरक्षित सीट घेऊन ती डॉक्टर झाली, ह्यात तिचा कमीपणा दिसत होता. ती सारखी सगळ्यांसमोर हाच विषय काढायची आणि नाही म्हटलं, तरी वादावादी व्हायची.

बघता बघता लग्नाला तीन वर्षे झाली. अशाच एका पावसाळी रात्री ऑगस्ट महिन्यात राहुलचा जन्म झाला. नातू झाला ही बातमी कळताच आपटे आजी-आजोबा राग विसरून नातवाला बघायला आले. नातू आणि सून दोघांवर फिदा झाले. राहुल बाळ होतच इतकं गुणी, की जो त्याला बघायचा तो त्याच्यावर प्रेम करायचा. त्याच्या डाव्या गालावर एक तीळ होता, जसं काही नजर लागू नये म्हणून देवानेच काळजी घेतली होती. एकाच गावात असल्याने खूप वेळा तो आजी-आजोबांकडे असायचा. रेवती धुसमुसायची, "सारखे ब्राह्मणांचे संस्कार होतात त्याच्यावर," रवींद्रही चिडायचा, "म्हणजे काय ? सर्वात चांगलेच संस्कार होत आहेत." झालं भांडण सुरू. हळू हळू छोट्या वादाचं रुपांतर मोठ्या भांडणात होऊ लागलं. रवींद्र भरपूर ड्रींक्स घेऊ लागला. घरी उशिरा येऊ लागला. दोघांच मात्र राहुलवर जीवापाड प्रेम होतं. एकदा रवींद्रची काकू बोलून गेली, "देखणा आहेस रे बाळा बापासारखा, त्याचा रंग का नाही रे घेतला ?" झालं, दोन दिवस रेवती तणतणत होती. रेवतीचा आधीपासूनच स्वतःच्या जातीविषयी मनात अढी होती. वयानुसार आणि रवींद्र बरोबरच्या संसारात ती कमी व्हायच्या ऐवजी वाढली होती. सारखी राहुलला म्हणायची. "बघ रे बाबा, तू पूर्ण ब्राह्मण नाही. माझा अंश पण आहे तुझ्यात." रवींद्र ते हसून घालवायचा, "हो, राजा आईसारखा हुशार आहेस तू."

जसा राहूल मोठा होत गेला, त्याच्या मनात जातीविषयी खूप गोंधळ व्हायचा. तो मनाने खूप हळवा होता आणि घरच्या अशा वातावरणानी तो पार गोंधळून जायचा. "बाबा, तुम्ही आणि मी वेगळे आहोत ना ?" "तुम्ही पूर्ण ब्राह्मण, मी मात्र कमी आहे ना ?" हे ऐकून रवींद्र खूप विचलित व्हायचा. एके दिवशी रात्री, राहुल झोपल्यावर रेवतीशी हा विषय काढला.

"हो मग, त्याला कळलच पाहिजे, ह्या देशात रहायचं असेल तर, खालची जात म्हणजे काय ते."

रविंद्र चिडला. "अग जात-पात विसरून आपण माणूस कसा आहे, ते बघायला हवा, राहुलला पण आपण हेच शिकवायला हवं. ह्या तुझ्या अशा वागण्यामुळे राहुल खूप कन्फ्यूझ होताय - he is losing his identity and his confidence." पण रेवतीला काही ते पटेना.

जस-जसा राहुल मोठा होत गेला, आरक्षणाचा विषय सारखा समोर येऊ लागला. त्याने आईसारखे डॉक्टर व्हायचे ठरविले. बाबा म्हणाले "राजा खूप मेहनत करावी लागेल. ५० टक्के सीट्स आरक्षित असतात. उरलेल्या सीट्ससाठी लढायचं तुला." झालं, त्या दिवशी जणू तिसरं महायुद्धच झालं घरी.

त्या दरम्यान शहरात आरक्षणाविरूद्ध बरेच मोर्चे निघायचे, निदर्शने होत. राहुलचे मित्र जायचे- सगळेच जोशी, कर्वे, गुप्ते, देशपांडे. राहुल पण जायचा. अशाच एका मोर्चात एक मित्र म्हणाला, "राहुल तुला आरक्षणाबद्दल बोलायचा काही हक्क नाहिये. तु अर्धा आरक्षित आहेच" आणि सगळे हसले. राहुलनी लाजून मान खाली घातली आणि तडक घरी निघून आला. बाबांना घट्ट मिठी मारली आणि खूप रडला." बाबा, सांगा ना हो, मी उच्च जातीचा का नीच जातीचा ? आरक्षणाविरुध्द असलेले लोक मला त्यांच्यात येऊ देत नाही आणि आरक्षणाची बाजुने असणारे मला काफिर म्हणतात. तुझ्या आईने ब्राह्मणाशी लग्न करून जातीशी गद्दारी केली अस म्हणतात." एरवी कॉलेजच्या प्रोफेसरशी चर्चेत कधी न हरणारा रवींद्र मात्र निःशब्द झाला.

तिथे पोलीस स्टेशनमध्ये बसल्याबसल्या हे सर्व एखाद्या चित्रपटासारखं रवींद्रच्या डोळ्यासमोरून सरलं. इतक्यात एक कॉन्स्टेबल आत आला आणि इन्स्पेक्टरच्या कानात काहीतरी पुटपुटला. "काय झालं ? any news?" रेवतीने त्वरित विचारलं. "न्यूज आहे कि आज संध्याकाळी युनिव्हर्सिटी ऑफिसच्या समोर आरक्षण विरोधी मोर्चा होता. तिथे आरक्षणाचा बाजूने असलेल्या गटाबरोबर बोलाचाली झाली. दगडफेक पण झाली. जमावाला पांगवायला पोलीसांना हवेत फायरिंग करायला लागली. काहीतरी इन्सीडेंट झाला आहे. पण you don't worry आपला राहुल काही तिकडे गेला नसेल ना ?"

हे ऐकून मात्र दोघांच्या मनात पाल चुकचुकली. रवींद्र तडक उठला आणि इन्सपेक्टरचे खांदे धरून गदागदा हलवले. " "इन्स्पेक्टर, प्लीझ तुमच्या लोकांना नीट चौकशी करायला सांगा. काय ते लवकर बघा." इन्स्पेक्टर कांबळे चिडले, "मि. आपटे मला हात लावू नका. आमचे पोलीस आपलं काम बरोबर करत आहेत. तुम्ही असा माझ्यावर हल्ला केला तर तुम्हालाच आत टाकीन मी." हे ऐकून दोन कॉन्स्टेबल येऊन रवींद्रच्या दोन्ही बाजूला उभे राहिले. रेवती घाबरली, रवींद्र पण चपापला. सगळे चुपचाप बसुन एकमेकांची नजर चुकवीत राहिले. दरम्यान बाहेर पाऊस थांबला. वारा मात्र जोरात वाहत होता. रवींद्र आणि रेवती दोघे घट्ट हात धरून एकदा खिडकीकडे, मग घड्याळाकडे आणि मेणबत्तीकडे असे नजर फिरवित बसले. एका वाऱ्याच्या झुळुकेनी अचानक मेणबत्त्या विझल्या. मिट्ट काळोख झाला. नकळत दोघांचं अंग शहारलं आणि अचानक फोनच्या घंटीने ती भयानक शांतता चिरून निघाली. रवींद्रचे काळीज थरारले, रेवतीचे डोळे विस्फारले. इन्सपेक्टर फोनवर बोलत होते, "हो, बोला, काय ? फायरिंग ? कॅज्यूलटी ? किती वर्षाचा ? हो विचारतो, थांबा." रिसिव्हरवर हात ठेवून त्यांनी रवींद्रला विचारलं -"तुमच्या मुलाची काही खूण सांगता का ?" रवीद्रच्या तोंडून शब्द फुटेना. "त्याच्या डाव्या गालावर तीळ आहे, बाबासारखा देखणा, घाऱ्या डोळ्यांचा, तरतरीत नाक असलेला राजबिंडा मुलगा आहे माझा," रेवती हळू आवाजात म्हणाली. इन्स्पेक्टर पुन्हा फोनवर बोलले आणि हळूच फोन खाली ठेवला.

रवींद्र व रेवती श्वास रोखून, व्याकुळ नजरेनेच त्याला प्रश्न करतात. इन्स्पेक्टर कांबळे म्हणतात, "हो, दोन्ही गटांमध्ये हातापायी झाली. पोलीस आल्यावर दोन्ही गट आपापली मंडळी घेऊन पसार झाली. तुरळक मुलच राहिली तिथे. इकडून तिकडून दगड मारत होते, तो दगड एका मुलाच्या डोक्यात लागला आणि तो तिथेच कोसळला."

"कोण होता तो मुलगा ? कोण होता सांगा ना. माझा राहुल नव्हता ना ? तो भित्रा होता, तो अशा ठिकाणी जाणारच नाही. सांगा ना इन्स्पेक्टर." रेवतीचा केविलवाणा स्वर इन्स्पेक्टरला ऐकवेना. त्याचे डोळे भरून आले. सावकाश उठला आणि जाता-जाता रवींद्रचा खांदा दाबला व sorry म्हणून निघून गेला.

रवींद्रच्या पायाखालची जमीनच जणू दुभंगली. एक क्षणच गेला, का एक युग सरलं ? अकाली म्हातारा झाल्यागत रवींद्र उठला आणि खिडकीपाशी गेला. पाऊस पुन्हा सुरू झाला होता. खिडकीच्या गार गजांवर डोकं ठेवून, डोळ्यातले अश्रू पावसात मिसळले. रेवतीच्या काळीज चिरणाऱ्या किंकाळीने वातावरण भरून गेलं. ढग गडगडत होते, विजा चमकत होत्या, आज पण रात्र पावसाळीच होती.